CIDCO
WE MAKE CITIES

मंगळवार, २७ मे २०२५ | मुंबई | प्रहार

# सिडको आपत्कालीन नियंत्रण कक्षात तक्रारी नोंदवू शकणार

◆ मुंबई (प्रतिनिधी) :




सिडको महामंडळाचा आपत्कालीन नियंत्रण कक्ष सोमवारपासून ३० सप्टेंबर २०२५ या पावसाळी कालावधीमध्ये २४/७ तत्त्वावर कार्यान्वित करण्यात आला आहे. दरवर्षी पावसाळी कालावधीमध्ये सिडकोतर्फे नवी मुंबईतील सिडको अधिकार क्षेत्रातील नागरिकांकरिता आपत्कालीन नियंत्रण कक्ष कार्यान्वित करण्यात येतो. पावसाळ्याच्या कालावधीमध्ये उद्भवणाऱ्या संभाव्य आपत्ती लक्षात घेता सिडकोचा सुसज्ज असा आपत्कालीन नियंत्रण कक्ष कार्यरत असतो.

२६ मे २०२५ रोजी सिडकोचे मुख्य दक्षता अधिकारी, सुरेश मेंगडे यांनी आपत्कालीन नियंत्रण कक्षाच्या तयारीचा व या कक्षाच्या माध्यमातून पार पाडल्या जाणाऱ्या सर्व सेवा व सुविधांचा आढावा घेतला. त्याचप्रमाणे सर्व संबंधित नोडल अधिकाऱ्यांना नागरिकांच्या मॉन्सून संबंधित तक्रारीचे वेगाने निराकरण करण्याचे आदेश दिले. सीबीडी बेलापूर येथील सिडको भवन इमारतीच्या तळ मजल्यावर असलेला हा नियंत्रण कक्ष कार्यालयीन कामकाजाच्या दिवसांसहित शनिवार, रविवार तसेच सार्वजनिक सुट्टीच्या दिवशीही २४ तास कार्यरत राहणार असुन या कक्षामार्फत अभियांत्रिकी विभाग, आरोग्य विभाग, अग्निशमन विभाग, सुरक्षा विभाग, उद्यान विभाग आदी महत्त्वाच्या विभागाचे कर्मचारी संपर्कात असतील.

सिडकोच्या आपत्कालीन नियंत्रण कक्षाद्वारे वृक्षांची पडझड वाहतुकीस अडथळा ठरणाऱ्या वृक्षांची छाटणी, रस्त्यावरील उघड्या गटारांची झाकणे पूर्ववत बसवणे, पूर/पूरसदृश परिस्थिती, रस्त्यांवरील खड्डे, रस्ते वा नाल्याजवळ साचलेला कचरा, व्यक्तीचे पाणीसाठ्याच्या ठिकाणी बुडणे, आग व आगीचे विविध प्रकार, साथीचे रोग, विषारी प्राणी चावण्यासंबंधी बाबी, इमारत कोसळणे, भूस्खलन, पाणी साचणे या आपत्तींची दखल घेण्यात येऊन त्याबाबत त्वरित कार्यवाही करण्यात येईल. नागरिकांनी वरीलपैकी कोणतीही आपत्ती उद्भवल्यास पुढे देण्यात आलेल्या दुरध्वनी अथवा व्हॉटसॲप क्रमांकावर किंवा ई-मेलद्वारे सिडको आपत्कालीन नियंत्रण कक्षाशी संपर्क साधून आपत्तीसंबंधी माहिती द्यावी किंवा त्याबाबतची तक्रार नोंदवावी.

@CIDCO_LTD @CIDCO_LTD @cidco_ltd @cidco_ltd

CIDCO
WE MAKE CITIES

सकाळ मुंबई, मंगळवार, २७ मे २०२५

# खारघर धबधब्यावरून पाच तरुणांची सुटका

## अग्निशमन दलाकडून बचावकार्य

खारघर, ता. २६ (बातमीदार) : मुसळधार पावसामुळे खारघरच्या सेक्टर ६ येथील धबधब्याखाली अडकलेल्या पाच तरुणांची अग्निशमन दलाकडून सुटका करण्यात आली. हे सर्व तरुण सायन कोळीवाडा येथील रहिवासी आहेत.

शहरात मागील दोन दिवसांपासून मुसळधार पाऊस सुरू असल्याने पांडवकडा धबधब्याचा आनंद लुटण्यासाठी पर्यटकांची पावले खारघरकडे वळत आहे, परंतु पांडवकडा धबधबा बंद असल्यामुळे सायन कोळीवाडा येथील आंबेडकर चाळीतील महेश शिरगड (वय २२), राकेश वेलमुर्गन (वय १८), प्रतीक जोग (वय १८), रमेश चिंगमेटे (वय १९) आणि साहील शेख (वय २१) हे पाचही तरुण सोमवारी खारघरच्या सेक्टर ६ मध्ये गोल्फ कोर्सच्या मागील बाजूस असलेल्या धबधब्याखाली पावसाचा आनंद घेत होते. दुपारनंतर पावसाचा जोर वाढल्याने हे पाचही तरुण धबधब्याखाली अडकल्याची माहिती खारघरच्या अग्निशमन केंद्राला मिळाली. त्यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत त्यांची सुटका करून खारघर पोलिसांच्या ताब्यात दिले. यंदा पांडवकडा धबधबा बंद आहे. १० वर्षांपूर्वी काही तरुण वाहून गेल्याचा प्रकार घडला होता. त्यामुळे पर्यटकांनी डोंगरावर जाऊ नये, असे आवाहन खारघर अग्निशमन केंद्राचे अधिकारी सौरभ पाटील यांनी केले.



खारघर : धबधब्यावर अडकलेल्या तरुणांना बाहेर काढण्यात आले.

@CIDCO_LTD @CIDCO_LTD @cidco_ltd @cidco_ltd




**लोकसत्ता**
मंगळवार, २७ मे २०२५

# सिडकोचा पावसाळी ‘वॉर रुम’

**नवी मुंबई :** सिडकोने सोमवारी पावसाळी मोसमासाठी सीबीडी बेलापूर येथे मुख्य नियंत्रण कक्ष सुरू केला असून हा कक्ष २४ तास रहिवाशांसाठी कार्यान्वित राहणार आहे.

पावसाळी मोसमात उद्भवू शकणाऱ्या पूर, रस्ते उधळणे, रस्त्यावर खड्डे पडणे तसेच इमारत कोसळणे, भूस्खलन, विषारी प्राणी चावणे यांसारख्या विविध आपत्तींचे त्वरित निराकरण करण्यासाठी हा कक्ष स्थापन केला आहे. पुढील क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन केले आहे -

दूरध्वनी क्रमांक - ०२२-६७९१८३८३/८३८४/८३८५, ०२२-२७५६२९९९. व्हॉट्सॲप: ८६५५६८३२३८. टोल फ्री: १८००२६६४०९८ फॅक्स: ०२२-६७९१८१९९. ई-मेल: eoc@cidcoindia.com

@CIDCO_LTD @CIDCO_LTD @cidco_ltd @cidco_ltd




लोकसत्ता
मंगळवार, २७ मे २०२५

# पांडवकड्यावर अडकलेल्या पाच तरुणांची सुटका

**पनवेल :** मुंबईतील शीव येथून वर्षासहलीसाठी खारघर येथील डोंगररांगांमध्ये फिरण्यासाठी आलेले पाच तरुण सोमवारी दुपारी डोंगरावरील धबधब्यातील पाण्यात अचानक वाढ झाल्याने धबधब्यावरच अडकून पडले. खारघर अग्निशमन दलाचे जवान आणि खारघर पोलिसांनी या तरुणांची सुटका केली.

खारघर उपनगरातील गोल्फकोर्सच्या मागील ड्राईव्हींग रेंजच्या येथून पांडवकड्यावर जाण्यासाठी पायवाटेचा मार्ग आहे. नवी मुंबईचे पोलीस दरवर्षी पावसाळ्यात पांडवकड्यावरील धबधब्यावर जाण्यास मनाई आदेश काढतात. जून महिन्याच्या सुरुवातीला हे आदेश नागरिकांसाठी जाहीर केले जातात. मात्र मे महिना सुरू असल्याने यंदा पोलिसांनी मनाई आदेश काढले नव्हते. याचा फायदा घेऊन सोमवारी हे पाच तरुण पांडवकड्यावर वर्षासहलीसाठी डोंगरावर गेले होते. मुसळधार पावसामुळे खारघर डोंगरातून निघणाऱ्या धबधब्याचे पाणी अचानक वाढल्याने या तरुणांना पाण्याचा अंदाज आला नाही.

@CIDCO_LTD
@CIDCO_LTD
@cidco_ltd
@cidco_ltd




जागरूक टाइम्स | मुंबई | मंगलवार, 27 मई 2025

# सिडको आपातकालीन नियंत्रण कक्ष संचालित

**नवी मुंबई।** सिडको महामंडल का आपातकालीन नियंत्रण कक्ष आज से 30 सितंबर तक इस बरसात के दौरान 24/7 आधार पर संचालित किया गया है। हर वर्ष बरसात के दौरान सिडको की ओर से नवी मुंबई क्षेत्र में सिडको के अधिकार क्षेत्र में आने वाले नागरिकों के लिए आपातकालीन नियंत्रण कक्ष संचालित किया जाता है। बरसात के दौरान उत्पन्न होने वाली संभावित आपदाओं/दुर्घटनाओं को ध्यान में रखते हुए सिडको का सुसज्ज आपातकालीन नियंत्रण कक्ष कार्यरत रहेगा। सिडको के मुख्य सतर्कता अधिकारी, सुरेश मेंगडे ने आपातकालीन नियंत्रण कक्ष की तैयारी और इस कक्ष के माध्यम से प्रदान की जाने वाली सभी सेवाओं और सुविधाओं का निरीक्षण किया। सभी संबंधित नोडल अधिकारियों को नागरिकों की मानसून संबंधी शिकायतों का शीघ्र समाधान करने का आदेश दिया। सीबीडी बेलापुर स्थित सिडको भवन इमारत के भूतल पर स्थित यह नियंत्रण कक्ष कार्यालयीन कार्य दिवसों सहित शनिवार, रविवार और सार्वजनिक छुट्टियों के दिन भी 24 घंटे कार्यरत रहेगा। इस कक्ष के माध्यम से आपातकालीन स्थितियों में इंजीनियरिंग विभाग, स्वास्थ्य विभाग, अग्निशमन विभाग, सुरक्षा विभाग, उद्यान विभाग आदि महत्वपूर्ण विभागों के कर्मचारी 24 घंटे संपर्क में रहेंगे। सिडको के आपातकालीन नियंत्रण कक्ष के माध्यम से पेड़ गिरना/यातायात में बाधा डालने वाले पेड़ों की छंटाई, सड़कों पर खुले मैनहोल के ढक्कन लगाना, बाढ़/बाढ़ जैसी स्थिति, सड़कों पर गड्ढे, सड़क या नाले के पास जमा कचरा, लोगों का जलभराव वाले स्थान पर डूबना, आग और आग की विभिन्न प्रकार की घटनाएं, संक्रामक रोग, विषैले जानवरों के काटने से जुड़ी घटनाएं, इमारत गिरना, भूस्खलन, पानी भराव आदि आपदाओं की जानकारी लेकर उस पर त्वरित कार्रवाई की जाएगी। नागरिक आपदा में सिडको आपातकालीन नियंत्रण कक्ष से संपर्क कर आपदा की जानकारी दें या उसकी शिकायत दर्ज कराएं।

**▪ बरसात के दौरान नागरिक दर्ज कर सकेंगे शिकायत**

CIDCO
WE MAKE CITIES

मुंबई, मंगलवार
27.5.2025
नवभारत

# सिडको में आपातकालीन नियंत्रण कक्ष हुआ शुरू

## 24x7 के आधार पर नागरिक दर्ज करा सकेंगे शिकायत

■ **नवी मुंबई,** (सं). सिडको का आपातकालीन नियंत्रण कक्ष मानसून के मौसम के दौरान 24 x 7 आधार पर चालू हो गया है. हर साल मानसून के मौसम के दौरान सिडको नवी मुंबई में सिडको क्षेत्राधिकार के नागरिकों के लिए एक आपातकालीन नियंत्रण कक्ष संचालित करता है. मानसून के मौसम में होने वाली संभावित आपदाओं, दुर्घटनाओं से निपटने के लिए सिडको के पास एक अच्छी तरह से सुसज्जित आपातकालीन नियंत्रण कक्ष है. 26 मई 2025 सिडको के मुख्य सतर्कता अधिकारी सुरेश मेंगड़े ने आपातकालीन नियंत्रण कक्ष की तैयारियों और इस कक्ष के माध्यम से प्रदान की जाने वाली सभी सेवाओं और सुविधाओं की समीक्षा की. सभी संबंधित नोडल अधिकारियों को नागरिकों की मानसून संबंधी शिकायतों का शीघ्रता से समाधान करने के आदेश दिए गए.




### तत्काल होगी कार्रवाई

सीबीडी बेलापुर में सिडको भवन के भूतल पर स्थित यह नियंत्रण कक्ष कार्यालय कार्य दिवसों, शनिवार, रविवार और सार्वजनिक अवकाशों सहित 24 घंटे कार्यरत रहेगा. इस कक्ष के माध्यम से इंजीनियरिंग विभाग, स्वास्थ्य विभाग, अग्निशमन विभाग, सुरक्षा विभाग, उद्यान विभाग आदि महत्वपूर्ण विभागों के कर्मचारी आपातकालीन स्थिति में 24 घंटे संपर्क में रहेंगे. सिडको का आपातकालीन नियंत्रण कक्ष यातायात में बाधा डालने वाले वृक्षों के गिरने, सड़कों पर खुले नालों के ढक्कनों को बदलने, बाढ़ जैसी स्थित में तत्काल कार्रवाई करेगा.

@CIDCO_LTD @CIDCO_LTD @cidco_ltd @cidco_ltd